दै. उद्याचा मराठवाडा दि. 16.03.25

# दुचाकी चोरीच्या आवळल्या मुसक्या



पाच दुचाकीसह आरोपी घेतले ताब्यात

नांदेड (प्रतिनिधी) : नांदेड शहर व जिल्हाभरात दुचाकी चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. दुचाकी चोरीच्या टोळीने थैमान घातले असतानाच पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनात नांदेड पोलिसांनी मोठी कारवाई केली असून आरोपींना ताब्यात घेत त्यांच्याकडून पाच दुचाकी जप्त करण्यात आले आहेत. तब्बल दोन लाख सत्तर हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

मागील काही दिवसांपासून मुदखेड पोलिस ठाणे हद्दीतून दुचाकी चोरीस जाण्याच्या घटना वाढत आहेत. यात व्यापारी महमद फेरोज महमद सलीम (२८ वर्ष रा. नवी आबादी मुदखेड) यांनी ११ रोजी मध्यरात्री घरासमोरून दुचाकी चोरीस गेल्याची फिर्याद दिली होती. या अनुषंगाने तपास सुरू असतांना सकाळी १० च्या सुमारा काही संशयित आरोपी शहरात फिरत असल्याची माहिती पोलिस पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपीस एका दुचाकीसह ताब्यात घेत चौकशी केली. आरोपी निरंजन सापन्ना भुसतवाड २१, योगेश गंगाधर नागधरवाड वय २० वर्ष, व अजय साहेबराव भूसलवाड वय २१ वर्ष, व्यवसाय शेती रा. सर्व बितनाळ ता. उमरी या तिघांना पोलिसी हिसका दाखवताच विविध ठिकाणाहून दुचाकी चोरल्याचे सांगीतले.

या कारावाईत एमएच २६ बीवाय ६५४८ पो. स्टे उमरी, एमएच २२ एवाय ०७५१ पो. स्टे मुखेड, एमएच २६ सीजे ५००८ पोस्ट.स्टे. इस्तापूर, एमएच २६ सीआर ४६५८ पो.स्टे. इस्तापूर आणि होंडा शाइने एमएच २० एफएच ५०७० पो. हदगाव या ५ दुचाकी एकुण २ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई पोलिस निरीक्षक वसंत सप्रे, पोउपनि शिवाजी शिंदे, पोहेकॉ चंद्रशेखर मुंडे, बलवीर सिंग ठाकूर यांच्या पथकाने केली.

## डी मार्टच्या पार्किंग मधून दुचाकी लंपास

नांदेड शहरातील अत्यंत महत्त्वपूर्ण बाजार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डी मार्टच्या पार्किंग मधून आज एक दुचाकी लंपास केल्याची माहिती मिळाली आहे. याप्रकरणी वृत्त लिहीपर्यंत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला नसला तरी डी मार्ट सारख्या अत्यंत प्रतिष्ठेच्या समजलेल्या जाणाऱ्या बाजारपेठेतून दुचाकी चोरी करण्यापर्यंत चोरट्यांची मजल गेली असल्याने ग्राहकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रस्तुत कारवाई यशस्वीपणे पार पाडणाऱ्या अधिकारी व अंमलदार यांचे जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अभिनंदन केले. तर यापुढे दुचाकी चोरी करणाऱ्यांवर भविष्यात अजून कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यातील विविध पोलीस ठाण्याचे हद्दीतून वारंवार दुचाकी चोरीच्या घटना घडत आहेत. हॉटेल ,दुकान , सिनेमा , थेटर्स , बाजार अथवा ऑफिसच्या ठिकाणी दुचाकी उभी करून कामाला गेल्यानंतर किंवा खरेदीसाठी बाजारपेठेत गेल्यानंतर अनेकांच्या दुचाकी लंपास झाल्याच्या घटना घडल्या आहेत. दुचाकी चोरीच्या एका घटनेचा तपास सुरू होण्यापूर्वी अन्य दुचाकी चोरी गेल्याची नोंद पोलीस दप्तरी केली जात आहे . विशेषत: नांदेड शहरातील सर्वच भागातून दुचाकी चोरीच्या घटना घडत आहेत . पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी या बाबतीत विशेष लक्ष देऊन दुचाकी चोरट्यांचा बंदोबस्त करण्याच्या सूचना दिल्या होत्या.